लक्ष्मण रभाजी वाघ - वादी
विरूध्द
रंगनाथ रभाजी वाघ - प्रतिवादी

## नियमीत दिवाणी दावा कमांक १९९/ १९९५ मधील निशाणी २२६ खालील आदेश

वादीने प्रस्तुतचा अविभक्त हिंदु कुटूंबाचा असणा-या मिळकतीतील त्याचा हिस्सा ठरवुन मिळण्याकरिता दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्ज नि. २२६ मध्ये वादीने कथन केले आहे की, प्रस्तुत दाव्यामध्ये नि. ५ वर न्यायालयाने आदेश पारीत करून वादीचे लाभात मनाई हुकूम दिला होता, त्यानंतर दाव्यामध्ये निकाल होवून निकाल वादीच्या बाजूने झाला आणि वादीचा दावा मंजुर करण्यात आला. त्यानंतर वादीने दाव्यातील हुकूमनाम्याच्या बजावणीकरिता दरखास्त दाखल केली त्यामध्ये आदेश झाला परंतु प्रतिवादी यांनी हुकूमनाम्याची अमंलबजावणी होवू दिली नाही. दरम्यान प्रतिवादी यांनी रे.अ.न. १७/ २००२ दाखल केला. प्रतिवादी यांनी बेकायदेशीरपणे महसुल अधिकारी यांच्याकडे अर्ज देवुन फेरफार क्र. ८६७, १०२४ आणि १०२९ नुसार वाटप करून घेतले. ते वाटप वादीला न सांगता बेकायदेशीरपणे झाल्याने ते वादीवर बंधनकारक नाही. वादीने त्याकरिता रे.चौ.अ.न. ९/२००८ दाखल केला आहे.

३. वादीने पुढे कथन केले आहे की, बेकादेशीर वाटपानुसार आलेल्या क्षेत्रानुसार प्रतिवादी क्र. २ यांनी गोपीनाथ रभाजी वाघ यांनी गट क्र. १०३ पैकी उत्तरेकडची मधली जमीन ०.४० आर रूपये दोन लाख पंच्याऐशी हजार रूपयांना ति-हाईत इसमास विक्री केली आहे. अजूनही काही जमीनी प्रतिवादी क्र. २ विक्री करण्याचा विचारात आहे. अशा प्रकारे त्याने दावा मिळकती विक्री केल्यास दाव्याचा

निकाल लागेपर्यंत सर्व दावा मिळकत विक्री करण्यात येईल. त्यामुळे वादीची हानी होण्याचा संभव आहे. सबब दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिवादीयांना दावा मिळकत कोणत्याही प्रकारे हस्तांतरण, गहाण, दान, विक्री,करू नये असा दरम्यानचा मनाई हुकूम मिळावा अशी वादीने विनंती केली आहे.

४. प्रतिवादींतर्फे म्हणणे दिले आहे की, वादींचा मनाई ताकीदीचा अर्ज, ॲफिडेव्हिट यांतील सर्व मजकूर खोटा व लबाडीचा आहे. तो प्रतिवादींना मान्य नाही. नि. ४८ वर दिलेली कैफियत पाहिली तर गट क्र. १०३ च्या वाटण्या वहिवाटी कलम २ मध्ये सचित्र नमुद केल्या आहेत. वादीचा गट क्र. १०३ मध्ये पुर्व दक्षिण कोप-यात अडीच एकर क्षेत्र आहे आणि ते अबाधित आहे. नियमीत दिवाणी दावा क्र. १९९/१९९५ चे निकाल जिल्हा न्यायालयाकडून बाजूला सारण्यात आला आणि दावा पुन्हा न्यायालयाकडे नव्याने निकाली करण्याकरिता पाठविण्यात आला साहजीक त्यानुसार तथाकथीत दरखास्त क्र. ९/२००८ व त्यातील आदेशास अर्थ राहिलेला नाही. फेरफार क्र. ८०७, १०२४ आणि १०२९ हे कायदेशीर आहे किंवा बेकायदेशीर आहे याबाबतचा निर्णय निकालानंतर होणार आहे. वादीने हिश्श्याचे वर्णन प्रतिवादी यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये केले आहे. त्या हिश्श्यास कोणीही धक्का लावलेला नाही. उलट वादी प्रतिवादी यांना त्रास देण्याकरिता सदर प्रकारचे अर्ज दाखल करत आहे. प्रतिवादी यांना पिककर्ज घेता येवू नये याकरिता वादीने प्रस्तुतचा खोटा अर्ज दाखल केला असल्याने तो रदद करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली.

५. वादीतर्फे ॲड. श्री. थोरात व प्रतिवादीतर्फे ॲड. श्रीमती मालपाणी यांचे युक्तीवाद ऐकले असता खालील प्रश्न माझ्यासमोर आले. त्यांची उत्तरे मी त्याखाली लिहीलेल्या कारणांसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| प्रश्न | | उत्तरे |
| --- | --- | --- |
| १. | वादींना प्रथमदर्शनी बाजू आहे का? | होय |
| २. | सोयीचा समतोल वादींचे बाजूने आहे का? | होय |
| ३. | मनाई हुकूम केला नाही तर वादींचे अपरिमित नुकसान होईल का? | होय |
| ४. | काय आदेश दयावा? | अर्ज मंजुर करण्यात आला. |

## कारणमीमांसा

६. वादींनी निशाणी २२७ कडे त्याचे स्वत:चे प्रतिज्ञापत्र दाखल केले असून प्रस्तुत अर्जासमवेत मौजे पळसखेडे ता. संगमनेर येथील फेरफार क्रमांक २४०३ दाखल केला आहे. याउलट, प्रतिवादींनी कोणतीही पुरावा कागदपत्रे दाखल केली नाही.

**प्रश्न क्रमांक १ ते ३ :-**

७. वादींतर्फे ॲड. श्री. थोरात यांनी युक्तीवाद केला की, वादीने प्रस्तुतचा दावा हा अविभक्त हिंदु कुटूंबाचा असणा-या मिळकतीतील त्याचा हिस्सा ठरवुन मिळण्याकरिता दाखल केला. दाव्यामध्ये वादीच्या बाजूने निकाल झाला मात्र त्याची अंमलबजावणी होण्यापुर्वीच प्रतिवादीने वरिष्ठ न्यायालयात निकालविरूध्द अपील दाखल केले. दरम्यान प्रतिवादींनी बेकायदेशीरपणे महसुल अधिकारी यांचेसमोर दावा मिळकतीचे वाटप करून घेतले त्यानंतर त्याआधारे प्रतिवादी क्र. २ याने दावा मिळकतीतील काही भाग ति-हाईत इसमांस विक्री केला. वादीस ज्ञात झाले आहे की, प्रतिवादी सदर मिळकतींची विक्री करत आहेत तसेच त्या प्रयत्नात आहेत. अशा प्रकारे दावा मिळकती विक्री केल्यास दाव्याचा निकाल लागेपर्यंत सर्व दावा मिळकत विक्री करण्यात येईल. सबब दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिवादीयांना दावा मिळकत कोणत्याही प्रकारे हस्तांतरण, गहाण, दान, विक्री, करू नये असा दरम्यानचा मनाई हुकूम मिळावा आणि वादीचा अर्ज

मंजुर करावा.

८. याउलट, प्रतिवादींतर्फे ॲड. श्रीमती मालपाणी यांनी युक्तीवाद केला की, वादींचा अर्ज खोटा आहे. प्रतिवादींनी वादीचा गट क्र. १०३ मध्ये पुर्व दक्षिण कोप-यात अडीच एकर क्षेत्र विक्री केलेले नाही. नियमीत दिवाणी दावा क्र. १९९/१९९५ चे निकाल जिल्हा न्यायालयाकडून बाजूला सारण्यात आला आणि दावा पुन्हा न्यायालयाकडे नव्याने निकाली करण्याकरिता पाठविण्यात आला. फेरफार क्र. ८०७, १०२४ आणि १०२९ हे कायदेशीर आहे किंवा बेकायदेशीर आहे याबाबतचा निर्णय निकालानंतर होणार आहे. वादीने हिश्श्याचे वर्णन प्रतिवादी यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये केले आहे. त्या हिश्श्यास कोणीही धक्का लावलेला नाही. वादी प्रतिवादी यांना त्रास देण्याकरिता सदर प्रकारचे अर्ज दाखल करत आहे. वादीने प्रस्तुतचा खोटा अर्ज दाखल केला असल्याने तो अर्ज नामंजुर करण्यात यावा.

९. वादीने प्रस्तुत अर्जासमवेत मौजे पळसखेडे ता. संगमनेर येथील फेरफार क्रमांक २४०३ दाखल केला आहे त्याचे अवलोकन करता असे दिसुन येते की, गोपीनाथ रभाजी वाघ यांनी मौजे पळसखेडे येथील क्षेत्र १ हे. २० आर गट क्र. १०३/1 हे शरद इंद्रभान गाडेकर यांना विक्री केले आहे तसेच त्याबाबची नोंद दिनांक १०.०८.२०१६ रोजी मंजुर झाली आहे. प्रस्तुत दाव्याचे अवलोकन करता असे प्रथमदर्शनी सिध्द होते की, विक्री झालेले क्षेत्र हे दावा मिळकतीचा भाग आहे. वादीचा दावा त्याचा दावा मिळकतीमध्ये असणारा अविभक्त हिस्सा मिळण्याकरिता आहे. फेरफार क्रमांक २४०३ नुसार प्रतिवादी क्र. २ याने दावा मिळकतीमधील काही भाग विक्री केल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. वादीने कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. २ आणखी दावा मिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात आहे. अशा परिस्थितीमध्ये जर प्रतिवादींनी दावा मिळकत विक्री केली तर त्याचा थेट परिणाम वादीच्या हिश्श्यावर होणार आहे. सबब दाव्याचा

निकाल लागेपर्यंत वादीच्या लाभात मनाई हुकूम देणे न्यायोचीत होणार असल्याने, आणि प्रतिवादींनी जर दावा मिळकतीमधील आणखी हिस्सा विक्री केला तर त्याचे नुकसान वादीस होण्याची प्रथमदर्शनी शक्यता दिसत असल्याने वादीचा अर्ज मंजुर करणे न्यायोचीत होणार आहे. उलटपक्षी वादीचा अर्ज मंजुर केल्यास त्याचा कोणताही दुष्परिणाम प्रतिवादी यांस होत नाही. सबब सदयस्थितीत न्यायाचा समतोल प्रथमदर्शनी वादीच्या पक्षाकडे झुकत आहे. झालेल्या फेरफार नोंदी या कायदेशीर आहेत किंवा बेकायदेशीर याचा उहापोह आणि निर्णय अंतिम पुराव्याआधारे होणार असून प्रस्तुत दाव्याचा गुणदोषावर निकाल होईपर्यंत प्रतिवादी यांनी वादी कथन करतो त्याप्रमाणे वाद मिळकतींची विक्री केल्यास त्यामध्ये वादीचा हक्क असल्यास तो निश्चीत करणे गुंतागुतींचे आणि अवघड होवून बसेल. सबब मी अशा निष्कर्षास आलो आहे की, वादीने त्याची बाजू प्रथमदर्शी सिध्द केली आहे, तसेच सोईचा समतोल वादीच्या हक्कात आहे व दावा प्रलंबित असतना प्रतिवादी यांनी दावा मिळकत विक्री केल्यास, वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे त्यामुळे दावा मिळकत संरक्षीत करण्याकरीता प्रतिवादी यांच्या विरुध्द तात्पुरता मनाईचा आदेश देणे कमप्राप्त झाले आहे. सबब मी मुददा क. १ ते ३ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुददा क. ४ करिता</u>:-**

१०. मुददा क. १ ते ३ च्या चर्चेमध्ये आणि अभिलेखावर आलेला एकंदरीत पुराव्याचे अनुषंगाने वादीने त्यास प्रतिवादी यांनी दावा मिळकतींची विक्री केल्यास, त्यामुळे वादीचे न्याय हक्कास बाधा येईल आणि वादीस अडचणी निर्माण होतील हे प्रथमदर्शनी सिध्द केले आहे. सबब वादी मागणी करतो त्याप्रमाणे तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यास वादी पात्र ठरत आहे. त्यामुळे मुददा क. ४ च्या उत्तरादाखल मी खालील आदेश पारित करीत आहे-

## <u>आदेश</u>

१. वादींचा नि.२२६ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी स्वत: अगर इतरामार्फत दावा मिळकतीचे दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत कोणत्याही प्रकारे हस्तांतरण, गहाण, दान, विक्री करू नये असा तुर्तातुर्त मनाईचा आदेश प्रतिवादींना देण्यात येत आहे.

३. अर्जाचा खर्च मुळ दाव्यासोबत ठरवण्यात येईल.

दिनांक : १९.०७.२०१७.
संगमनेर

( पी. आय. मोकाशी )
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, संगमनेर.